क्रमांक : १८३८३ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : डिसेंबर, २०२१.
02 DEC 2021

**: : परिपत्रक : :**

महाराष्ट्र विधानसभा व महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधीमंडळाचे तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१ हे बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार आहे. हिवाळी अधिवेशन, २०२१ कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेशासाठी कोविड-१९ लसीकरणाचे दोन डोस पूर्ण झालेल्या सर्व मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी यांची RT-PCR चाचणी विधान भवन, मुंबई येथे करण्यात येणार आहे. सदरहू चाचणीचा तपासणी अहवाल नकारात्मक (निगेटिव्ह) आलेल्यांनाच विधान भवन, मुंबई येथे अधिवेशन कालावधीत प्रवेश द्यावा, असा निर्णय दिनांक सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांना आगामी तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१ कालावधीत विधान भवन, मुंबई येथे उपस्थित राहणे सोईचे व्हावे याकरिता सर्व सन्माननीय सदस्यांनी शासकीय / खाजगी रूग्णालयात घेतलेल्या कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरणाची माहिती या सचिवालयाच्या http://mls.org.in/covid-report/index.html या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या गुगल फॉर्ममध्ये बुधवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी पर्यंत अपलोड करावी.

..२/-

तसेच ज्या सन्माननीय सदस्यांनी अद्याप कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरणाचा दुसरा डोस घेतला नसेल त्यांचेकरिता कक्ष क्रमांक ११८, पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे बुधवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या कालावधीत कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(राजेश तारवी)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
५) मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी व कक्ष.
७) सुरक्षा विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी
८) विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.